# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 11/08/2020 (मंगळवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मांडवी शिवार कुकुटपालन केन्द्र येथे दिनांक 09/08/2020 चे 23:00 वा. पुर्वी फिर्यादी नामे– आरीफ अब्दुल अजीज अगवानी, वय 35 वर्ष, रा. कावळापेठ नागपूर यांच्या कुकुटपालन केन्द्राचे रूमच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन रूममध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने रूममध्ये ठेवलेली ऍक्साईड कंपनीची जुनी बॅटरी कि. 20,000/–रू. व एम ईन्वरटर कि. 15,000/–रू. असा एकुण कि. 35,000/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ देवशंकर गुप्ता 9511247261 हे करीत आहे.

### फसवणुक

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 0.5 कि मी अंतरावर स्टेट बॅक ऑफ इंडिया एटीएम परसोडी, उमरेड येथे दिनांक 06/08/2020 चे 10.00 वा. ते दिनांक 10/08/2020 चे 11.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– सुनिल खेमदेव चुटे, वय 51 वर्ष, रा. बहीनाबाई, नगर उमरेड हे एसबीआय एटीएम मध्ये पैसे काढण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या एटीएम रूम मध्ये पिन कोड माहित करून त्यांचा एटीएम कार्ड जवळ ठेवुन त्यांचे जवळील दुसरा एटीएम कार्ड हातचालाखीने अदलाबदली करून कार्ड फिर्यादीला दिले. यानंतर आरोपीने फिर्यादीचे एटीएम कार्ड मधुन 96,500/–रू. रक्कम काढुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ धुर्वे 9823935457 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत भारतीय स्टेट बॅक एटीएम, पारशिवनी येथे दिनांक 09/07/2020 ते दिनांक 12/07/2020 चे 11.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– ज्ञानदेव गणपत लोखंडे, वय 62 वर्ष, रा. वार्ड क्र. 6, खापरखेडा रोड पारशिवनी यांचे एस.बी.आय. बॅक शाखा पारशिवनी येथे खाते असुन फिर्यादी हे त्यांचे ए.टी.एम. कार्ड घेवुन एस.बी. आय. ए.टी.एम. मध्ये गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने एस.बी.आय. चे ए.टी.एम.अदलाबदली करून फिर्यादीच्या खात्यातुन 1,95,027/–रू. पैकी आळीपाळी ने 1,40,000/–रू. काढुन फिर्यादीची फसवणुक करून विश्वासघात केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी विरुध्द कलम 420, 406 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पळनाटे 7378086178 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर